**एस.सी.सी.क्रं. ८७५/२०२५**
**नि. ०९**

**सरकारतर्फे सा.क्र.१**

**शपथेवर**

माझे नांव : प्रल्हाद पोपटराव ठोंबळ,
वय : ३० वर्ष, धंदा : शेती,
राहणार : कांगोणी, ता. नेवासा, जि.अहमदनगर.

**<u>सरतपास सरकार पक्षातर्फे विद्वान सरकारी वकिल श्रीमती एस. पी. औताडे यांचेमार्फत शपथेवर सुरु</u>** -

१. माझा अपघात दि.१०/०४/२०२४ रोजी संध्याकाळी ०६.३० ते ०६.४५ च्या दरम्यान कांगोणी गावाच्या हद्दीतील रौंदळ वस्तीच्या कच्च्या रोडवर अहमदनगर ते संभाजी नगर हायवे रोडवर झाला होता. सदर दिवशी मी व माझे काका भरत दत्तु कोकाटे असे बजाज प्लॅटीना कंपनीची मोटारसायकल एम एच १७ सी क्यु १६०४ वरून घ ोडेगावरून कांगोणीला आमच्या घरी ठोंबळ वस्ती येथे चाललो होतो. मोटारसायकल मी स्वत: चालवत होतो व माझे काका मागे बसले होते. सदर दिवशी रौंदळ वस्तीकडुन कच्च्या रोडने एक निळया रंगाचा ट्रॅक्टर त्याला जुगाड जोडले होते असा रस्ता ओलांडुन तो हायवे कडे भरधाव वेगाने येत होता आम्ही त्याला हॉर्न वाजवुन ईशारा दिला परंतु तो ट्रॅक्टर भरधाव वेगात पुढे तसाच येउन डिव्हायडरच्या येथे येउन थांबला. माझी गाडी बजाज प्लॅटीना ही ट्रॅक्टरला लावलेल्या जुगाडाला जाउन धडकली. सदर धडकेमुळे मी डाव्या साईडला खाली पडलो व माझ्या काकांचा उजवा पाय फ्रॅक्चर झाला. काकांच्या बरगडीला, छातीला व चेह-याला मार लागला. सदर धडकेमुळे माझ्या पायाला व हाताला मुक्का मार लागला होता.

२. त्यानंतर मी माझ्या काकांना रोडवरून बाजुला घेतले व माझ्या बंधु व वडीलांना फोनकरून बोलावुन घेतले. त्यानंतर आम्ही काकांना घेउन नगर येथील मॅककेअर हॉस्पीटलला ॲडमीट केले. त्यानंतर डॉक्टरांनी आम्हाला सांगितले की, काकांचा उजवा पाय व बरगडी फ्रॅक्चर झाली आहे त्यामुळे त्यांना रूग्णालयात दाखल करून घेतले. माझे काका हॉस्पीटलमध्ये दहा ते बारा दिवस ॲडमीट होते. त्यांची काळजी घ ेण्यासाठी मला तेथे थांबावे लागले. त्यानंतर मी २० तारखेला शनिशिंगणापुर पोलीस स्टेशनला फिर्याद दिली. आता मला फिर्याद दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असुन

त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. फिर्यादीस **निशाणी १०** देण्यात येते. ज्या ट्रॅक्टरने आम्हाला धडक दिली होती तो विना नंबरचा निळया रंगाचा व त्याला पाठीमागे जुगाड जोडलेले होते. तो ट्रॅक्टर बाळासाहेब कारभारी देवगिरे हा चालवत होता. त्यांना पाहिल्यास मी ओळखू शकतो. ते आजरोजी न्यायालयात उपस्थित आहेत.

**<u>सरतपास पुर्ण.</u>**

**<u>आरोपींतर्फे विद्वान वकील श्री. एस. एस. सकट यांच्यामार्फत उलटतपास सुरू.</u>**

३. माझे शिक्षण बी. कॉम पर्यंत झालेले आहे. माझ्या काकांचे गाव कांगोणी आहे. माझ्या काकांना एक भाउ आहे परंतु तो वेगळा राहतो. काकांची आई आजरोजी हयात आहे. हे म्हणणे खरे नाही की, काका व त्यांच्या भावाचे एकत्र कुटुंब आहे. साक्षीदार सांगतो की, आई काकांसोबत राहते त्यांचे बंधु वेगळे राहतात. दवाखान्यात माझ्या सोबत माझे बंधु व वडील होते. मी काकांसोबत ८ ते ९ दिवस दवाखान्यात थांबलो. सुरूवातीचे दोन दिवसामध्ये मी, माझा भाउ व वडील हॉस्पीटलमध्ये थांबलो होते. त्यानंतर मी एकटाच थांबलो होतो. काकांचे भाउ त्यांना हॉस्पीटलमध्ये भेटुन गेले होते.

४. हे म्हणणे खरे आहे की, अ.नगर ते संभाजी नगर हायवेरोडवर वाहनांची वर्दळ असते. हे म्हणणे खरे आहे की, नगरवरून येताना डाव्या हाताला वळके की, रौंदळ वस्तीकडे रोड जातो.

**प्रश्नः** ट्रॅक्टरच्या जुगाडामध्ये उस असल्यामुळे वजन असते व त्यामुळे ट्रॅक्टरचा स्पीड कमी असतो ?

**उत्तरः** त्या ट्रॅक्टरच्या जुगाडामध्ये उस नव्हता.

**प्रश्नः** तुमची मोटारसायकल स्पीडमध्ये असल्यामुळे तुम्हाला रौंदळ वस्तीकडे जाणारा रस्ता लक्षात आला नाही ?

**उत्तरः** माझी मोटारसायकल ६० च्या स्पीडने होती. मला रौंदळ वस्तीकडे जाणारा रस्ता लक्षात होता.

५. हे म्हणणे खरे नाही की, रस्ता लक्षात न आल्यामुळे तुम्ही गाडीचा ब्रेक

लावला. साक्षीदार सांगतो की, मी स्पीड कमी करण्यासाठी ब्रेक लावला होता. हे म्हणणे खरे नाही की, मी अचानक ब्रेक लावल्यामुळे मी व माझे काका मोटारसायकलवरून खाली पडलो. हे म्हणणे खरे नाही की, ट्रॅक्टर व जुगाड हा त्याच्या बाजुने चालला होता व त्याने आम्हाला धडक दिली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला मी प्रथमच न्यायालयात पाहत आहे. साक्षीदार सांगतो की, यापुर्वी देखील ब-याच वेळा पाहिले आहे कारण ते उस टाकत असतात. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या काकाला अपघातामध्ये दुखापत झाली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी मोटारसायकल चालवत होतो व माझ्या मागे काका बसले होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या दिवशी मी स्वत: मोटारसायकल चालवत नसल्याने मला व माझ्या काकाला दुखापत झाली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी घटनेच्या दिवशी स्वत: ट्रॅक्टर चालवत नव्हता. साक्षीदार सांगतो की, मी माझ्या डोळयाने पाहिले आहे की, आरोपी स्वत: ट्रॅक्टर चालवत होता. हे म्हणणे खरे नाही की, अपघात केवळ मी माझी मोटारसायकल भरधाव वेगात चालवत असल्यामुळे झाला. फिर्याद दिल्यानंतर माझी पोलीसांसोबत भेट झालेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, फिर्याद मी अनोळखी व्यक्तीविरूद्ध दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा घटनेशी संबंध नसल्यामुळे मी फिर्याद अनोळखी व्यक्तीविरूद्ध दिली होती. हे म्हणणे खरे नाही की, अपघातामध्ये आमची चुक असताना केवळ माझ्या काकांना नुकसान भरपाई मिळावी या उद्देशाने आरोपीची चुक नसताना मी त्याच्याविरूद्ध फिर्याद दिली. हे म्हणणे खरे नाही की, आजरोजी मी खोटी साक्ष दिलेली आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृती**
स्वाक्षरीत/-
**(लीना अ. काळे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.४,नेवासा

दि. २३/०३/२०२६